# महाराष्ट्र विधानसभा

**द्वितीय अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लांजा (जि.रत्नागिरी ) तालुक्यातील शालेय शिक्षण विभागातील केंद्र प्रमुखांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) २७४९१ (११-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) येथील शालेय शिक्षण विभागात केंद्र प्रमुखांची पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदय:स्थितीत केवळ ८ केंद्र प्रमुख कार्यरत असून पाच केंद्र प्रमुखांकडे एकुण तीन -तीन केंद्रे असून तीन केंद्र प्रमुखांकडे दोन -दोन केंद्रे आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) केंद्रप्रमुख पदे भरली जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने

दि. ०१.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये व दि. ०९.०३.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये केंद्रप्रमुख पदी निवड व पदोन्नतीच्या अनुषंगाने (पदभरतीबाबतचे प्रमाण व अर्हता इ.) तरतूदी सुधारित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार केंद्रप्रमुख पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रात्र शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(२) ३२२२५ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्र शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत दि. १७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनाने निर्णय घेतला असतानाही पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभाग व्यतिरिक्त राज्यात अन्यत्र कुठेही या शासन निर्णयाची आजतागायत अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याच्या तक्रारी दूर करून रात्रशाळांच्या समस्यांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने दिनांक २५ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभ्यासगटाकडून याबाबतच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय, व या शिफारशींबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) रात्रशाळेचे सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०८.१२.२०२२ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. रात्रशाळेबाबत सर्वकष अभ्यास करुन समितीकडून प्राप्त शिफारशीस अनुसरुन धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रिक्त असलेल्या शिक्षकांच्या युनेस्कोच्या अहवालानुसार जागा भरण्याबाबत**

**(३) ३२५८६ (१२-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये असलेली शिक्षकांची कमतरता भरुन काढण्यासाठी सुमारे ११ लाख १६ हजाराहून अधिक शिक्षकांची आवश्यकता असल्याचे व त्यामध्ये राज्यात ७४ हजारांहून अधिक शिक्षकांची आवश्यकता असल्याने युनेस्कोच्या स्टेट ऑफ एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया-२०२१ नो क्लास नो टीचर संदर्भातील अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात शिक्षक, अध्यापन, शिक्षकांचे शिक्षण अशा विविध मुदृयांचा समावेश असून त्यानुसार राज्यात ७४ हजाराहून अधिक रिक्त असलेल्या जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यात आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षक पद भरती बाबत**

**(४) ३४७१६ (१७-०१-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित शाळांतील शिक्षकांची भरती प्रक्रिया पवित्र संकेतस्थळाद्वारे राबवणे बंधनकारक असताना काही शाळांकडून वृत्तपत्रात जाहिरात देऊन परस्पर शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शाळांनी रिक्त जागा परस्पर भरल्या असून त्या शिक्षकांना शालार्थ क्रमांकही मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) याबाबत शासन स्तरावर तक्रारी प्राप्त झाल्यास प्रकरणपरत्वे चौकशी करुन अनियमितता करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासन नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात येत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) ३४९९६ (१७-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे ऑक्टोबर, २०२० अखेर ३ हजार शिक्षण संस्था समायोजनाच्या प्रतिक्षेत असताना सांगली जिल्हयातील जत तालुक्यात ४३६ जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये २२७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जत तालुक्यातील वर्षोनुवर्षे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) अंशत: हे खरे आहे.
(२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिक्षक सेवकांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(६) ३५९०२ (१७-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशभरातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमरता भरुन काढणेसाठी सुमारे ११ लाख ते १६ हजारांहून अधिक व महाराष्ट्रात ७४ हजारांहून अधिक शिक्षकांची भरती करणेची गरज असल्याचे युनेस्को च्या अहवालातून निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशात १५ लाख ५१ हजार शाळांपैकी ८४ टक्के ग्रामीण भागात असून सदर शाळांमध्ये सुमारे ९४ लाख ३० हजार ८३९ शिक्षकांपैकी ७२ टक्के शिक्षक ग्रामीण भागातील आहेत.महिला शिक्षकांचे प्रमाण ५० टक्के आहे.देशात १ लाख १० हजार ९७१ एकशिक्षकी शाळा आहेत. एकूण १९ टक्के शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त जागा आहेत. ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक या प्रमाणानुसार ११ लाख १६ हजार शिक्षकांची आवश्यकता आहे हे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण व्यवस्था सक्षम होणेसाठी व विद्यार्थ्यांना शिक्षण घेणेसाठी शासनाकडून शिक्षक भरतीसाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) आयबीपीएस कंपनीमार्फत आयोजित करण्यात आलेली शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल सद्यस्थितीत प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
राज्यात सद्यस्थितीत आधारकार्डच्या आधारे विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करून,संचमान्यता करण्याची कार्यवाही होत आहे. त्याआधारे राज्यातील रिक्त शिक्षकीय पदे निश्चित करून, अभियोग्यता चाचणीमध्ये उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांकनानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषद व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या मागणीनुसार पवित्र पोर्टलच्या माध्यमातून उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालयीन प्रशासकीय इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत..**

**(७) ३९४९१ (०९-०४-२०२२). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवी मुंबई येथील मुख्यालयाची प्रशासकीय तीन मजली इमारत कांदा-बटाटा मार्केटमध्ये असून या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील लेखा विभागाचा स्लॅब धोकादायक झाल्याने पोलादी रॉडचे टेकू लावण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचा स्लॅब कधीही कोसळण्याची शक्यता असल्याचे कांदा-बटाटा मार्केट आवारातील प्रशासकीय कार्यालयात संचालक मंडळाच्या बैठकी निमित्त येणारे अधिकारी-कर्मचारी तसेच तेथील अभियांत्रिकी, लेखा-अधिकारी व अन्य अधिकारी-कर्मचारी व तेथे असणारे व्यापारी व नागरीकांच्या जिवीतास धोका असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी इमारत धोकादायक असल्याने तिच्या पुर्नविकासाची प्रक्रिया कार्यान्वित असतांना न्यायालयात दावे दाखल झाल्याने पुनर्विकासाचे काम रखडल्याचे अध्यक्ष,एपीएमसी यांचेकडून सांगण्यात येत आहे हे लक्षात घेता सदर दावे कोणी दाखल केले आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी सर्व संबंधितांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-११-२०२३) :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.
मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवी मुंबईच्या कांदा-बटाटा मार्केटमधील इमारतीच्या आर.सी.सी. स्ट्रक्टचर मध्ये तडे
गेल्याने दुरावस्था झाली आहे. त्याअनुषंगाने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबईने सदर ठिकाणाची दुरूस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे.
(३) दि.फ्रुट मर्चंट वेल्फेअर असोसिएशन यांनी महाराष्ट्र राज्य व इतर विरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.११३३४/१३ दाखल केली आहे.
सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार इमारतीच्या दुरूस्तीबाबत मा.उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी असे निर्देश दि.२१.०४.२०१५ रोजी दिले आहेत. तसेच, दुरूस्तीच्या कामकाजासंदर्भात प्राप्त आक्षेपांचा नियमानुसार विचार करून पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घेण्यात यावा व बाजार समिती निवडणूकांबाबत सद्य:स्थिती मा.उच्च न्यायालयास कळवावी असे निर्देश दि.१७.०४.२०१७ दिले होते.
सदर न्यायालयीन प्रकरण खारीज करण्यात आले आहे. सन २०१९-२० मध्ये मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती येथे संचालक मंडळाची निवडणूक झाली

असून सद्य:स्थितीत तेथील सदस्य पात्र/ अपात्रतेबाबतची प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे पुनर्विकासाच्या मुद्द्यावर संचालक मंडळाकडून
अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती येथील कांदा बटाटा मार्केट इमारत धोकादायक घोषित झाल्याने व्यापाऱ्यांना ट्रांझिट कॅम्पमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर
करण्याकरीता बाजार समितीने नोटिस बजावली आहे. परंतु अद्यापही तेथील व्यापारी स्थलांतर झाले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टीईटी परीक्षेत अपहार झाल्याबाबत

**(८) ४०१६५ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नुकत्याच झालेल्या टीईटी परीक्षेत अपहार झाला असल्याने प्रामाणिकपणे अभ्यास करून गुणवत्तेच्या आधारे स्वतःला सिद्ध करू पाहणारे विद्यार्थी नाउमेद होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक पात्रता धारण करूनही वाढते वय, कुटुंबावरच अवलंबून रहावे लागणे त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी स्वीकारू शकत नसल्याने विपरीत मानसिकता तयार होऊन नैराश्यात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परीक्षार्थींना दिलासा देण्यासाठी पुन्हा परीक्षा घेताना त्यांचे परीक्षा शुल्क माफ करुन त्यांना सोईस्कर परीक्षा केंद्र देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पेपरफुटीच्या गुन्ह्यात दोषी आढळून आलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शासनपत्र दि. १०.०६.२०२२ अन्वये महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ मध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे दाखल झालेल्या गुन्ह्याचे अनुषंगाने गैरप्रकारामध्ये समाविष्ट उमेदवारांची संपादणूक रद्द करणे व शास्ती निश्चित करणे यापुढे घेण्यात येणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेसाठी कायमस्वरुपी प्रतिबंधित करणे वा इतर कोणती उचित शिक्षा निश्चित करुन त्याप्रमाणे कारवाई करण्याचे निर्देश दिले. याबाबत दाखल रिट याचिकांमध्ये मा.न्यायालयाने पुढील आदेश होईपर्यंत संबंधितांवर कारवाई करु नये, असे अंतरिम आदेश दिले आहेत. तथापि, सद्यस्थितीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील माध्यमिक शाळांमध्ये गणित व विज्ञान शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(९) ४३८६५ (०९-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील माध्यमिक शाळांमध्ये गणित व विज्ञान या विषयांच्या शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात खाजगी शाळांमार्फत कोरोना काळात शुल्क आकारल्याबाबत**

**(१०) ४४८२९ (१७-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात खाजगी शाळांमार्फत कोरोनाच्या काळात शाळा बंद असतानाही पालकांकडून फि शुल्क वसुल केले जात असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयान्वये ज्या शाळांनी १५ टक्के शुल्क कपातीची अंमलबजावणी केली नाही अशा शाळा व्यवस्थापनास शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन नोटीसा बजावूनही अद्याप काही शाळांमार्फत फी शुल्क वसुल केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खाजगी शाळांमार्फत फी शुल्काचा एक हप्ताही थकला असल्यास विद्यार्थ्यांना गुणांचा निकाल दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा खाजगी शाळा व्यवस्थापनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: रायगड जिल्ह्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(११) ४५०३१ (१७-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण सेवकांचे मानधनात वाढ करण्याची मागणी शिक्षण सेवकांकडून होत असताना रायगड जिल्ह्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनातून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात १० महिन्यांचा व्यावसायिक कर कपात केला असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण सेवकांना किमान वेतन आणि घरभाडे भत्ता देण्यासाठी शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक ०७.०९.२०११ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अनुकमे रु. ६,०००/-, रु. ८,०००/-, रु.९,०००/- मानधन देण्यात येत होते. यामध्ये दिनांक ०७.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षकांना अनुकमे रु. १६,०००/-, रु.१८,०००/-, रु.२०,०००/- एवढे सुधारित मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या विषयांच्या शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ४५३१९ (१७-०९-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित अशा महत्वाच्या विषयांची तब्बल पाच हजार शिक्षक आणि सहायक शिक्षकांची पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २६ मार्च, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या काही वर्षात अनेक शिक्षक निवृत्त झाले असूनही पदे अद्याप भरलेली नसून राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात २०१२ पासून शिक्षक भरती बंद असून दहा वर्षात शिक्षक भरतीसाठी वेगवेगळे आदेश देऊनही त्याबाबतची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे हि निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी शिक्षक संघटनेकडून, लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२), (३) अंशत: हे खरे आहे.
(४) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कला शिक्षकांची पदे भरण्याबाबत**

**(१३) ४५४८७ (१७-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कला शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून सात वर्षांपासून एक ही पद भरण्यात आलेले नसल्याचे दिनांक ०३ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदांवर तातडीने कला शिक्षकांची भरती करण्यात यावी, अशी मागणी कला शिक्षक महासंघाच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२) व (३) कला शिक्षक अतिरिक्त ठरले असल्याने सन २०१७ च्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीमध्ये पदभरती करण्यात आलेली नाही. सन २०२२ च्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीमध्ये कला विषयाच्या पदांसाठी चाचणी परीक्षा घेण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंढरपूर (जि.सोलापूर) येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शाळेतील मुख्याध्यापकांच्या नियुक्तीबाबत

**(१४) ४५७८१ (१७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शाळेतील मुख्याध्यापकांच्या नियुक्ती प्रकरणी सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांची चौकशी करण्याचे आदेश पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानाही शिक्षणाधिकारी श्री.भास्कर बाबर यांनी अधिकाराचा गैरवापर करून संस्थेने सेवामुक्त केलेल्या मुख्याध्यापक श्री.भगवान महाडीक यांच्या संगनमताने सुमारे २९ लाख २५ हजार ५५ रुपये इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधीत शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (३१-१०-२०२३) :** (१) होय

(२) सदर प्रकरणी संबंधितांच्या वेतनाची रू. २९ लाख २५ हजार ५५ रुपये इतकी रक्कम नियमानुसार वेतन देयक शालार्थ वेतन प्रणालीत तयार करून वेतन पथकामार्फत संबंधितांच्या बॅंक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याविरूध्द दि. २०.०१.२०२३ च्या शासन ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे. विभागीय चौकशी अधिकारी नियुक्ती करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयात केंद्रीय विद्यालय उभारण्याबाबत

**(१५) ४६५०४ (१७-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ आजाराने मागील दोन वर्षात ज्या मुला-मुलींनी आपले पालक गमावले आहेत अशा मुलांना केंद्रीय विद्यालयात मोफत प्रवेश देण्याचा निर्णय घेतलेला असून बुलढाणा जिल्हयात केंद्रीय विद्यालय नसल्याने या अनाथ मुलांच्या मोफत शिक्षणाचा प्रश्न अंधातरी असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात केंद्रीय विद्यालयासाठी १६ एकर जागा घेण्यात आली असुन देऊळघाट रोडवर ही जागा आहे शिक्षण विभागाकडूनही बहुतांश प्रक्रिया पूर्ण झालेली असून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या डायट जागेत केंद्रीय विद्यालय सुरु केल्यास अनाथ मुलांना त्याचा लाभ घेता येईल हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनाथ मुलांना केंद्रीय विद्यालय सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) बुलढाणा जिल्हयात केंद्रीय विद्यालयाकरीता देऊळघाट रोडवरील १६ एकर जागा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी निश्चित केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ४८२५० (२३-०९-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १ लाख ९ हजार ९४२ शाळा असून त्यापैकी सुमारे ६९ हजार ४५४ शाळांमध्ये नियमित मुख्याध्यापक तसेच केंद्र प्रमुखांची पदे रिक्त असल्याचे तसेच सन २०१७ पासून संच मान्यता आणि शिक्षक भरती प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दर्यापूर (जि.अमरावती) येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागात गटशिक्षण अधिकाऱ्यासह केंद्र प्रमुखांच्या १० जागा रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरणे आणि संच मान्यता देऊन शिक्षक भरती करण्याची मागणी विविध संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२), (३) व (४) केंद्रप्रमुख पदे भरली जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने दि.०१.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये व दि.०९.०३.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये केंद्रप्रमुख पदी निवड व पदोन्नतीच्या अनुषंगाने (पदभरतीबाबतचे प्रमाण व अर्हता इ.) तरतूदी सुधारित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार केंद्रप्रमुख पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच राज्यात आधार आधारित संचमान्यतेचे काम सुरु असुन, त्याआधारे राज्यातील रिक्त शिक्षकीय पदे निश्चित होणार आहेत. तसेच आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील रात्रशाळांबाबत सर्व समावेशक धोरण निश्चित करणेबाबत

**(१७) ५०३०२ (१८-०१-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रात्रशाळांबाबत येत्या दोन महिन्यात सर्व समावेशक धोरण तयार करण्यात येणार असल्याचे तसेच शिक्षण हक्क कायदयानुसार विना अनुदानित शाळांच्या स्वमान्यतेची प्रक्रिया सुटसुटीत करण्यासाठी एक स्वतंत्र प्रणाली विकसित

करण्याचे व प्रलंबित असलेल्या सर्व शाळांना मान्यता देण्याची प्रक्रिया देखील तातडीने राबविण्याबाबत विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील, असे मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी विधीमंडळ सभागृहात जाहिर केले असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्रशाळांचे तास साडेतीन तासाहून कमी करुन अडीच तास केल्याचे व जे शिक्षक नियमित शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करतात त्यांना अर्ध्या वेतनावर रात्र शाळेत काम करण्याची परवानगी देण्यात आली असल्याचे शासनाने माहे जुलै, २०२२ मध्ये निर्गमित केलेल्या निर्णयात नमूद केले असल्याचे व त्यास शिक्षक संघटनांनी विरोध केला असल्याचे दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) रात्रशाळेचे सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०८.१२.२०२२ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. रात्रशाळेबाबत सर्वकष अभ्यास करुन समितीकडून प्राप्त शिफारशीस अनुसरुन धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जत (जि.सांगली) तालुक्यात कन्नड शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(१८) ५१५३० (१८-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील जत तालुका सीमावर्ती असल्यामुळे येथे कन्नड भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे परंतु मागील दहा वर्षांपासून कन्नड शिक्षकांची भरती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कन्नड शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

### राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनाबाबत

**(१९) ५१५३४ (१८-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात किमान वेतन कायदा सन १९४८ पासून लागू करण्यात आला असून समान काम समान वेतन कायदा सुद्धा राज्यात लागू असताना शिक्षण सेवकांना दरमहा रुपये सहा हजार मानधन दिले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण सेवक पद रद्द करून नवीन शिक्षक सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत किंवा मानधन किमान दरमहा रुपये एकवीस हजार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक ०७.०९.२०११ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अनुकमे रु. ६,०००/-, रु. ८,०००/-, रु. ९,०००/- मानधन देण्यात येत होते. यामध्ये दिनांक ०७.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अनुकमे रु. १६,०००/-, रु. १८,०००/-,
रु. २०,०००/- एवढे सुधारित मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शाळांचा दर्जा सुधारण्याबाबत

**(२०) ५२४१४ (१८-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता लक्षात घेवून, रिक्त पदांपैकी ५० टक्के शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे भरण्यात येतील तसेच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यास प्राधान्य देण्यात येईल असे शासनाने आश्वासन दिले असल्याचे दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, वर्गात शिक्षकांचे छायाचित्र लावण्याऐवजी शाळेतील परिचय फलकावर शिक्षकांचे छोटया आकाराचे छायाचित्र लावण्यात येईल असे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना
पाठयपुस्तकांमध्ये वहयांची जोड देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबत दि.०८.०३.२०२३ अनुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील विशेषत: अमरावती, कोल्हापूर जिल्हयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके अदा करण्याबाबत

**(२१) ५२६०९ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रुग्णालयात दाखल झाल्यास त्यांचा वैद्यकीय खर्च शासन करीत असते परंतु अमरावती जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय अनुदानाची रक्कम ८ महिन्यांपासून मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कोल्हापूर जिल्हयातील ७०० शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासोबत वैद्यकीय देयकांची प्रक्रियाही शालार्थ प्रणालीसोबत जोडली असून या प्रणालीत मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असून ऑफलाईन देयक मंजूर करण्याबाबतची मागणी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या विविध संघटनेकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे
(२) अमरावती व कोल्हापूर जिल्हयातील प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके अदा करण्यात आली असून माहे मार्च, २०२२ अखेर वैद्यकीय देयके प्रलंबित नाहीत.
(३) हे खरे नाही.
(४) वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके ऑनलाईन पध्दतीने पारित करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षणासाठी दर्जेदार शिक्षक मिळण्याकरिता आवश्यक अर्हता व पात्रता निश्चित करणेबाबत

**(२२) ५३४५९ (१८-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षणासाठी दर्जेदार शिक्षक मिळण्याकरिता घेण्यात येणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ही केवळ ४% असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांची गुणवत्ता कमी होण्याची नेमकी कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अधिक गुणवत्ताप्राप्त शिक्षक मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने शिक्षक पदावरील नियुक्तीस आवश्यक पात्रता व अर्हता निश्चित करण्याकरीता राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परीषदेस शैक्षणिक प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. यास्तव शिक्षक पदावरील नियुक्ती करीता शिक्षक पात्रता परीक्षा राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परीषदेकडून अनिवार्य करण्यात आलेली आहे. सदरची परीक्षा पात्रता परीक्षा असुन, याद्वारे उपलब्ध शिक्षकांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षकांची निवड होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी पेसा क्षेत्रातील शिक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(२३) ५७१५८ (२४-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचीत जमाती क्षेत्रातील १३ जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची ७ हजार १८७ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, अमरावती जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील मराठी माध्यमांचे १६५ आणि उर्दू माध्यमांचे एकूण १४ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पालघर जिल्ह्यामध्ये सुमारे १६४७ शिक्षकांची पदे रिक्त असून डी.टी.एड, बी.एड (TET/CTET) कृती समिती पालघर, महाराष्ट्र राज्य (नियो.) यांनी राज्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या पेसा क्षेत्रातील शिक्षक पद भरतीबाबत शासनास वेळोवेळी निवेदन देऊन तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरमयान मा. शालेय शिक्षण मंत्र्यांना लेखी निवेदन देऊन मागणी केलेली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी पेसा क्षेत्रातील शिक्षकांची ७ हजार १८७ पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास सदर रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
(५) वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदांच्या ८० टक्के पदे भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना कळविण्यात आले आहे.

---

## राज्यातील शिक्षकांचे वेतन अनुदाना अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२४) ५७१८५ (२४-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांचे वेतन अनुदानाअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नाशिक सह अनेक जिल्हयात अपुरा निधी मिळाल्यामुळे तालुक्यांतील शिक्षकांना डिसेंबर, २०२२ च्या वेतनापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषद संचालित शिक्षकांच्या वेतनासाठी तिसऱ्यांदा अपुरा निधी मिळाल्याने नगरपालिका, जिल्हयातील शिक्षकांचे माहे नोव्हेंबर,२०२२ या महिन्यांचे वेतन अद्यापपावेतो मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वेतन मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतनासाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. तथापि, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी १०० टक्के इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. तसेच वेतनासाठी तरतूद कमी असल्यामुळे ७ व्या वेतन आयोगाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यांसाठी मंजूर पुरवणी मागणीही वित्त विभागाच्या मान्यतेने नियमित वेतनासाठी उपलब्ध करुन मार्च, २०२३ अखेरची वेतनाची देयके प्राथम्याने अदा करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाचे सेवा प्रवेश नियम लागू करण्याबाबत

**(२५) ५८३४८ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही नियम लागू नसल्याची तक्रार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निवेदनातून प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन काय उपायोजना करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ राज्यातील सर्व खाजगी शाळांना लागू करण्यात आलेली आहे.त्यानुसार खाजगी शाळांतील कर्मचारी यांचे सेवाप्रवेश व सेवानियम विहित करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मानवत (जि.परभणी) शहरातील जिल्हा परिषद शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) ५९५३९ (२४-०४-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) शहरातील जिल्हा परिषद शाळेत एकुण १७० विद्यार्थी शिक्षण घेत असून येथील रिक्त पदांमुळे शाळेचा कार्यभार हा केवळ २ शिक्षकांवर असून त्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व्यवस्थापन समितीने शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शारीरिक शिक्षण शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(२७) ६१००३ (२५-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय मुलां-मुलींच्या बौध्दिक, शारिरिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी नियोजनपूर्वक दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचे मानले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १२ वर्षात शारीरिक शिक्षण शिक्षकांची भरतीच करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रिडा शिक्षक निर्माण करणारी बहुतांश बीपीएड कॉलेजही बंद पडली असल्याचे तसेच शिवाजी विद्यापीठाच्या (कोल्हापूर) कार्यक्षेत्रात सध्या एकही शारीरिक शिक्षक निर्माण करणारे बीपीएड महाविद्यालय सुरु नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शारीरीक शिक्षण शिक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असुन, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार पवित्र पोर्टलद्वारे शारीरिक शिक्षक उपलब्ध होऊ शकतात. तसेच शारीरिक शिक्षकांची पदभरती होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन मिळण्याबाबत

**(२८) ६१९५७ (२६-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांना शासनाच्या ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात यावे अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी शालेय शिक्षण मंत्र्यांकडे दिनांक ०२ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विनाअनुदानित शाळा १) पेंट ऑक्सफर्ड हायस्कूल,२) न्यू येरा हायस्कूल ३) सेंट जोसेफ बेंथोणी कॉन्व्हेंट हायस्कूल ४) झुलेलाल स्कूल ट्रस्ट या शाळांमधील शिक्षकांना शासनाच्या ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन मिळण्याच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेतील शिक्षकांना शासनाच्या ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्याकडे याबाबतची बैठक लावण्याचे नियोजित आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अशासकीय अनुदानित संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) ६२६२९ (२७-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने शा.नि.क्र. पदनि २०२२/प्र.क्र.-२/ २०२२ /आ.पु.क. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ अन्वये स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात अंदाजे ७५००० सरळसेवा कोटयातील पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक ३० सप्टेंबर २०२२ अन्वये ५० टक्के रिक्त पदे भरण्याबाबतचा शासन निर्णय काढला होता तो अशासकीय अनुदानित संस्थांसाठी काढलेला नसला तरीही पदभरतीसाठी मात्र ५० टक्क्यांची अट सर्वच अनुदानित संस्थांची रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेसाठी वापरण्याचा निर्णय घेतला असून त्यानुषंगाने पत्र व्यवहार केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शासननिर्णय जसाच्या तसा अशासकीय अनुदानित संस्थांमधील रिक्त पदे भरण्याबाबत न वापरण्याची कारणे काय आहेत तसेच अशासकीय अनुदानित संस्थांमधील पदभरतीसाठी वेगळा शासन निर्णय काढण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, ज्या विभागांचा अथवा कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे अशा विभाग/कार्यालयातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यास दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णय अन्वये मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच ही मंजूरी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकिय अनुदानित संस्थांसाठी लागू करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, ज्या विभागांच्या अथवा कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला नाही अशा विभाग / कार्यालयातील सरळसेवा कोटयातील वर्ग ३ ची रिक्त पदे ८० टक्के मर्यादेपर्यंत भरण्यास उपरोक्त शासननिर्णयाव्दारे मंजूरी देण्यात आली असल्यास ही मंजूरी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकिय अनुदानित संस्थांसाठीही लागू करण्यात आली आहे काय,
(६) असल्यास, अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रथम टप्प्यात ५० टक्के पदे भरण्यात येणार आहेत.
(३) असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला नाही.
(४) व (५) सदर शासन निर्णयातील तरतूदी शासकीय कार्यालयांना लागू आहेत.
शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.
त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकांची पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमापन परिक्षा घेतली नसल्याबाबत

**(३०) ६३०२५ (२६-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात माहे डिसेंबर, २०१७ नंतर शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमापन परिक्षा शासनाने घेतलेली नाही, त्यामुळे भावी शिक्षकांच्या वयोमर्यादा संपत असल्याने या विरोधात शिक्षक संघर्ष समितीने दिनांक २३ जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी 2022 चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राचार्य, टी.पी. भाटीया कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, मुंबई यांनी शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(३१) ६३२९० (२७-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील टी.पी. भाटीया कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात श्रीमती संगिता श्रीवास्तव ह्या प्राचार्य पदावर कार्यरत असून दिनांक १ जून, २०१२ ते दिनांक १० जून, २०१२ या कालावधीत शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षिकांसाठी आयोजित केलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणी या प्रशिक्षणास गैरहजर राहून शासनाची फसवणूक करुन प्रशिक्षण पूर्ण केले असे दाखविले असून त्यांना वरिष्ठ श्रेणी मिळण्यासाठीचा प्रस्ताव व्यवस्थापनाने शासनाकडे पाठविला असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राचार्य पदावर असताना शासनाची परवानगी न घेता प्रशिक्षण कालावधीमध्ये परदेशात जाऊनही त्यांना त्या परदेश भ्रमण कालावधीमध्ये टी.पी. भाटीया कनिष्ठ महाविद्यालयाने शासनाद्वारा आयोजित केलेल्या प्रशिक्षणास गैरहजर असूनही उक्त प्रशिक्षणास त्यांना हजर दाखवून त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असल्याचे शासनास प्रस्तावाद्वारे सादर करुन शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची बाब निदर्शनास येऊनही व्यवस्थापनाने श्रीमती श्रीवास्तव यांचेविरोधात कोणतीही कारवाई न करता बाब दडपून टाकल्याप्रकरणी चौकशी केली आहे काय,वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) शिक्षण निरिक्षक, पश्चिम विभाग, मुंबई यांनी सखोल चौकशी करुन दिलेल्या अहवालानुसार श्रीमती श्रीवास्तव यांच्याविरुध्द महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच त्यांना देण्यात आलेले वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ परत घेण्यात यावे व देण्यात आलेल्या आर्थिक लाभची रक्कम शासनखाती जमा करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेरळी-रिसनगांव-देवूळगांव-चितळी (ता.लोहा, जि.नांदेड) रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३२) ६५४११ (३०-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेरळी-रिसनगांव-देवूळगांव-चितळी (ता.लोहा, जि.नांदेड) रस्त्याचे काम प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर काम बंद असल्याचे माहे मे, २०२३ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळयापूर्वी या रस्त्याचे मजबुतीकरण झाले नाही तर येथील ग्रामस्थ, विद्यार्थी, रुग्ण यांची गैरसोय

होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३)

लव्हराळा ,रिसनगाव, बेरळी ,लोहा, धावरी रायवाडी प्रजिमा-५२ सा.क्र. कि.मी.००/०० ते १६/०० या लांबीत डांबरीकरण व सुधारणा करण्याचे रक्कम रु.१६ कोटीचे मंजूर काम सद्यस्थितीत प्रगतीत असुन डिसेंबर, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

मुललमानवाडी-पिंपळगाव बेटसांगवी-शेवडी माळाकोळी प्रजिमा-२८ सा.क्र. कि.मी. ३०/०० ते ४३/५०० या लांबीत डांबरीकरण व सुधारणा करण्याचे रक्कम रु.६.५० कोटीचे मंजूर काम सद्यस्थितीत प्रगतीत असुन डिसेंबर, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत सदर रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षकांच्या टेट परिक्षेच्या निकालाबाबत शासनाने चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत**

**(३३) ६५४९५ (२९-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक भरतीसाठी राज्य परीक्षा परिषदेतर्फे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ ते ०३ मार्च, २०२३ या कालावधीत आयबीपीएस संस्थेमार्फत ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांची अभियोग्यता आणि बुध्दीमापन चाचणी (टेट) परीक्षा घेण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिक्षेसाठी राज्यातील २ लाख ३९ हजार ४४४ उमेदवारांची नोंदणी करुन त्यापैकी २ लाख १६ हजार ४४४ उमेदवारांनी परिक्षा दिली असून या परिक्षेची गुणपत्रिका २०० गुणांची (मार्कलिस्ट) ठेवण्यात येऊन सदर परिक्षेचा निकाल दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी वा त्यादरम्यान प्रसिध्द करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिक्षेच्या निकालानुसार २०० गुणांच्या पत्रिकेत अनेक विद्यार्थ्यांना / उमेदवारांना १५० पेक्षा अधिक तर अनेकांना १८६ इतके गुण मिळाल्याचे दिनांक १४ मार्च,२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या निकालावरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बँकीग परिक्षेच्या धर्तीवर, सदर परिक्षेत प्रश्न विचारले गेले असल्यामुळे परिक्षेसाठी मर्यादीत वेळ, प्रश्नांची संख्या आणि काठिण्यपातळीचा विचार करता १५० पेक्षा अधिक मिळणे विद्यार्थी/उमेदवारांच्या अवाक्याबाहेरचे असल्यामुळे हा निकाल संशयास्पद असल्याने या १५० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणांबाबत पडताळणी करुन चौकशी करण्याची परिक्षार्थी उमेदवारांनी निकालानंतर शासनाकडे तात्काळ मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-११-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
अशा प्रकारची तक्रार आयुक्त (शिक्षण) कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.
(५) उपलब्ध माहितीचे अवलोकन करता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा २०१७ पेक्षा २०२२ परीक्षेची

काठीण्यपातळी थोडी जास्त असल्याचे निदर्शनास येते. TAIT २०१७ मध्ये ७० ते ११० दरम्यान गुण प्राप्त असणाऱ्या उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे. तर TAIT २०२२ मध्ये ६० ते १०० गुण असणाऱ्या उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे.

शासन निर्णय दिनांक २३ जून २०१७ मध्ये नमूद प्रमाणे अभ्यासक्रमामधील घटकावरच परीक्षा घेण्यात आलेली असल्यामुळे सदर परीक्षा बँकींग परीक्षेच्या धर्तीवर घेण्यात आली असे म्हणता येणार नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या माहितीनुसार अप्रात्र शिक्षक असल्याबाबत**

**(३४) ६५९१२ (०१-०९-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या माहितीनुसार सुमारे १२ हजार ६५३ शिक्षक बोगस असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयात बोगस शिक्षकांची संख्या एकुण संख्या १४०३ आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस शिक्षकांच्या बाबतीत योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-११-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ च्या परिक्षेमध्ये गैरप्रकार झाल्यामुळे एकूण ७८७४ उमेदवारांची संपादणूक रद्द केली आहे. तसेच महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१८ मध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे १६६३ उमेदवारांची संपादणूक रद्द करून संबंधितांस महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेकरिता कायमस्वरूपी प्रतिबंध घातलेला आहे. राज्यातील महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ मध्ये समाविष्ट असलेल्या व शासनाकडून वेतन घेणाऱ्या प्राथमिक शाळेतील ५७६ उमेदवारांचे शालार्थ आयडी गोठवून वेतन स्थगित करण्यात आलेले होते. तथापि, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आदेश दि. ३.८.२०२२विरूध्द मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे विविध याचिका दाखल झाल्यामुळे व सदर याचिकेतील अंतरिम आदेशानुसार संबंधितांचे वेतन अदा करण्याचे निर्देश असल्यामुळे अद्यापपर्यंत ५१० उमेदवारांचे वेतन सुरू करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: मुंबई, पुणे (पिंपरी,चिंचवड), छत्रपती संभाजीनगर येथील महापालिका शाळांतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) ६६३७३ (३०-०८-२०२३). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २३ महापालिका असून मुंबई, पुणे (पिंपरी-चिंचवड) छत्रपती संभाजीनगर इत्यादी अनेक शहरांमध्ये

महापालिका शाळांची संख्या मोठी असून या ठिकाणी रिक्त शिक्षकांची संख्या अधिक असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक ही पदे सरळसेवेने भरण्याबाबत शासनाचा नियम असतानाही ही पदे अद्याप रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने राज्यातील महापालिका शिक्षकांची व इतर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-११-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) शिक्षक भरतीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे सुमोटो जनहित याचिका क्र.२/२०२२ दाखल असून सदर याचिकेत मा.न्यायालयाने दि.१२.५.२०२३ च्या आदेशानुसार शासनामार्फत सादर करण्यात आलेले संभाव्य वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यास मनाई आदेश केलेला आहे. त्यामुळे भरती विषयक कारवाई मा.न्यायालयाच्या पुढील आदेशानंतर करता येईल.
शासन निर्णय दि. १.१२.२०२२ अन्वये केंद्रप्रमुखांची रिक्त असलेली ५० टक्के पदे विभागीय मर्यादित परिक्षेद्वारा व ५० टक्के पदोन्नतीने भरणेबाबत शासनाने निर्णय घेतलेला असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे यांचेमार्फत केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित परीक्षा घेणेकरिता दि.५.६.२०२३ नुसार २३८४ पदांकरिता जाहिरात देण्यात आलेली आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे विविध याचिका दाखल झाल्यामुळे उपरोक्त जाहिरातीनुसार घ्यावयाच्या परिक्षा सद्यस्थितीत पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा, विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा (जि.पालघर) या तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती निर्माण करण्याबाबत

**(३६) ६७०९५ (१२-०९-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.ठाणे) तालुका हा शेती प्रधान तालुका असून जगप्रसिद्ध अशा वाडाकोलम तांदळाचे संशोधन झाले असून मोठ्या प्रमाणात वन अधिकार मिळविणारे आदिवासी, शेतकरी हे नगदी पिक घेत आहे तसेच विक्रमगड, जव्हार, मोखाडा या तालुक्यातील गावांमध्ये आदिवासी, शेतकरी शेतात वेगवेगळे प्रयोग करीत शेतमाल पिकवित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र याच्यासाठी बाजारपेठ नसल्याने त्यांना आजमितीस मोठ्या अडचणीना सामोरे जावे लागत असल्याने कृषी उत्पन्न बाजार समिती निर्माण करणे ही काळाजी गरज असून या समितीच्या निमित्ताने वाडा, विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा तालुक्यातील शेतकऱ्याना मोठा दिलासा मिळण्यासाठी सदरहू तालुक्यामध्ये शेती मालाला योग्य बाजारपेठ मिळावी म्हणून या कृषी उत्पन्न बाजार समिती निर्माण करावी, अशी मागणी डॉ.हेमंत विष्णू सावरा यांनी सहकार मंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने वाडा, विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा या तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती निर्माण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पालघर जिल्ह्यातील वाडा, विक्रमगड, जव्हार व मोखाडा या तालुक्यात महाराष्ट्र शासनाची

आदिवासी विकास महामंडळाची भात खरेदी केंद्रे असुन सदर केंद्रामार्फत हमी भावाने शेतकऱ्यांकडून भात खरेदी केला जातो, पिकविलेल्या भाताला हमी भाव मिळत असल्याने आदिवासी विकास मंडळाच्या खरेदी केंद्रावर भात खरेदी केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील टोलनाक्यांवर फास्ट टॅग प्रणाली मुळे आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत**

**(३७) ६७२२७ (३०-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल नाक्यांवरील वाहनांच्या वाढत्या रांगामुळे व रोख रकमेला आळा बसावा यासाठी फास्ट टॅग बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फास्ट टॅग बंधनकारक केले असले तरी फास्ट टॅगमध्ये रक्कम जमा नसल्यास किंवा रक्कम वजा झाल्यास त्यात ऑनलाईन रक्कम जमा करण्यास अडचणी येत असल्यामुळे वाहन धारकांना नाहक दुप्पट टोल द्यावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुप्पट टोल वसूली रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-११-२०२३) :**(१) राज्यातील पथकर स्थानकावर फास्ट टॅग प्रणाली टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(२) फास्ट टॅग मध्ये पुरेशी रक्कम शिल्लक असणे आवश्यक आहे, अन्यथा पथकर स्थानकावर दंडनीय दराने पथकर भरावा लागतो. फास्ट टॅगसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली नसल्यास त्या फास्ट टॅग मध्ये ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरली जाऊ शकत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.चिखली जि.बुलढाणा) अंतर्गत हमाल, व्यापारी आणि कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३८) ६७३६९ (१२-०९-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.चिखली, जि.बुलढाणा) अंतर्गत हमाल, व्यापारी आणि इतर कामगारांच्या अनेक प्रलंबीत मागण्या असून खोट्या आणि बनावट तक्रारीच्या आधारे काही हमाल आणि व्यापारी यांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरुद्ध दिनांक २९ मे, २०२३ रोजी हलगी निनादव्दारे तीव्र आंदोलन करण्याचा

इशारा श्री.कैलाश खंदारे प्रदेशाध्यक्ष, ल.श.सेना यांनी दिनांक २० मे, २०२३ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषी आढळलेल्या संचालक मंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
तथापि, कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली अंतर्गत हमाल, व्यापारी आणि इतर कामगारांचे अनेक प्रलंबित मागण्या संदर्भात दि. २९ मे, २०२३ रोजी
हलगी निनादद्वारे तिव्र निषेध आंदोलन करण्याचा इशारा श्री.कैलास खंदारे, प्रदेशाध्यक्ष ल.श.सेना यांनी त्यांचे पत्र दि. २० मे, २०२३ नुसार सचिव, कृ.उ.बा.स.
चिखली यांना दिला, ही वस्तुस्थिती आहे.
कृषि उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने नवनिर्वाचित संचालक मंडळापुढे प्रस्ताव सादर करुन त्यावर चौकशीअंती पुढील निर्णय घेण्यात येईल असे
दि. २०.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्री.कैलाश खंदारे, ल.श.सेना यांना कळविले आहे. बाजार समिती प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर सदर इशारा
आंदोलन समाप्त करण्यात आले आहे. तसेच बाजार समितीने या प्रकरणी चौकशी सुरु केली आहे.
(४) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने दि.१५.०७.२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होऊन चर्चेअंती
कोणत्याही हमाल/व्यापारी यांचे परवाने रद्द केलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) येथे शिक्षण विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(३९) ६७९९२ (०१-०९-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील गट शिक्षणाधिकारी पदासह शिक्षण विभागातील २०३ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पद गत ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून रिक्त असून प्रभारी स्वरुपात कारभार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राजापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सदर रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (३१-१०-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत सरळसेवेने पदभरती तसेच पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत मराठी माध्यमांच्या शिक्षकांच्या रिक्त जागा भरणेबाबत

**(४०) ६९१०२ (३१-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक ३० विद्यार्थी मागे एक शिक्षक अनिवार्य आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक विभागाच्या मराठी माध्यमांच्या शिक्षकांच्या सुमारे १६ हजार ७४८ पेक्षा जास्त जागा रिक्त असल्याचे दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या मागील बारा वर्षापासून भरतीची बंदी २०१९ मध्ये उठल्यानंतर संच मान्यता निश्चित न झाल्याने शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शिक्षकांकडे मुलांना शिक्षण देण्याव्यतिरिक्त ११७ प्रकारची अशैक्षणिक कामे सोपविण्यात आल्याने शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत आहे खरे आहे काय,

(५) असल्यास, मराठी माध्यमांच्या रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) राज्यात उद्भवलेली कोविड परिस्थिती व चालू असलेली पदभरती ही बाब विचारात घेऊन सन २०२२ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी घेण्यासाठी शासनाने शासनपत्र दिनांक ३.८.२०२२ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे. सदर परीक्षेचे आयोजन दि. २२.२.२०२३ ते दि. ३.३.२०२३ या कालावधीमध्ये राज्यातील विविध परिक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे यांच्यावतीने आयबीपीएस कंपनीकडून घेण्यात आलेली आहे.

शासन परिपत्रक क्र.पोआरई-२०१०/प्र.क्र.२२५/प्राशी, दि.१८.०६.२०१० अन्वये बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम लागू केल्यामुळे ०६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची

जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे. त्यामुळे पदस्थापित केलेला कोणताही शिक्षक इतर कोणत्याही शाळा/कार्यालयात काम करणार नाही. तसेच त्यास दशवार्षिक जनगणना,आपत्ती निवारणाचे काम किंवा स्थानिक प्राधिकरण,राज्य विधानसभा,लोकसभा निवडणूकांच्या कर्तव्या खेरीज इतर कोणतेही शिक्षणेत्तर काम देण्यात येणार नाही असे आदेश देण्यात आलेले आहेत तसे संचालनालय स्तरावरून दि. १८.०२.२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच शासन परिपत्रक क्र. आरटीई २०१३/ प्र.क्र.१३२/ प्राशि-१, दि.३.५.२०१३ नुसार सर्व जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, आयुक्त महानगरपालिका,मुख्याधिकारी नगरपरिषद तसेच शालेय शिक्षण विभागाच्या सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देऊन शाळाबाह्य कामाकरिता शिक्षकांच्या सेवा वापरण्यात येऊन इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या सेवा रद्द करून नियुक्तीच्या शाळेवर वर्ग करण्यात याव्यात असे आदेश देण्यात आलेले आहेत.ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र. आजिव ४९१७/प्र.क्र.७९/आस्था-१४, दि.१६.०८.२०१७ च्या पत्रान्वये शिक्षकांनी शिक्षणाच्या कामाशिवाय अन्य कोणतेही काम करू नये वा प्रशासनाने म्हणजेच जिल्हा परिषदांनी त्यांचा उपयोग शिक्षणाशिवाय अन्य कामासाठी करू नये असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमध्ये महत्वाच्या विषयांसाठी शिक्षक उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४१) ६९३२३ (३१-०८-२०२३).श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर, बिलोली तालुक्यासह नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान या महत्वाच्या विषयाचे शिक्षक नसल्यामुळे ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आंदोलन केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांमध्ये महत्वाच्या विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) देगलूर तालुक्यात जि.प.हा.मरखेल,जि.प.हा.खानापूर,जि.प.हा.हणेगाव, जि.प.हा. करडखेड,जि.प.हा.शहापूर,ता.देगलूर येथे विषय शिक्षकांच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी जून च्या दुसऱ्या आठवड्यात आंदोलने केली आहेत. जि.प. हा मरखेल येथे गणित व इंग्रजी विषयाच्या विषयशिक्षकाची इतर माध्यमिक शाळेतील शिक्षक अतिरिकित शिक्षक देवून करण्यात आली आहे. जि.प.हा. खानापूर येथे इंग्रजी विषयाची व्यवस्था पदवीधर शिक्षक देवून करण्यात आली आहे. तर जि.प.हा. हणेगाव येथे इंग्रजी व गणित विषयाच्या विषयशिक्षकांची व्यवस्था पदवीधर शिक्षक देवून करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता तात्पुरती विषय शिक्षक देवून व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: पुणे येथे मुला- मुलींसाठीच्या वसतीगृह सुरु करण्याबाबत**

**(४२) ७०६३९ (०१-०९-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, पुणे येथे मुला-मुलींसाठी १००० क्षमतेच्या वसतीगृहासाठी जागा मिळावी, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिल्लक अनामत रकमेच्या ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याबाबतचा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाने शासनाला पाठविणे व इतर मागण्यांसाठी कॅम्प संस्थेच्यावतीने उच्च शिक्षण संचालनालयासमोर आंदोलन सुरू केले असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुला-मुलींची वसतीगृह सुरू करण्यासाठी मुंबई आणि पुणे जिल्हा अधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध करून देण्याबाबत उच्च शिक्षण विभागाच्या संचालकाने पत्रव्यवहार करूनही अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च शिक्षण विभागातील १२ विभागीय सह संचालक यांचा अतिरिक्त कार्यभार वाढविणे तसेच शासकीय महाविद्यालय संस्थामधील ज्या प्राचार्य संचालकांचा पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे त्यांची प्रशासकीय तात्काळ बदली करावी अशा मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबई आणि पुणे येथे मुला-मुलींचे वसतीगृह सुरू करणे तसेच इतर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२०-११-२०२३) :** (१) होय, कॉप्स या सामाजिक संस्थेने आंदोलन केले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, मुंबई या वसतिगृहाच्या पुर्नबांधकामास शासन निर्णय दि. १.११.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सर ज.जी. कला संस्था वसतिगृह व वास्तुशास्त्र महाविद्यालय वसतिगृहाच्या इमारत बांधकामास शासन निर्णय दि. २७.१०.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शासकीय तंत्र निकेतन, मुंबई या संस्थेच्या मुलांचे व मुलींचे वसतिगृह इमारत बांधकामास शासन निर्णय दि. २७.१०.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकडे शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग विद्यार्थ्यांसाठी करण्याबाबत शासन निर्णय दि. १३.१०.२०२३ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत शासन निर्णय दि. १३.१.२०२३ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. प्राचार्य, संचालक यांच्या बदल्यासंदर्भात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुद व प्रशासकीय निकड विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी, मनपा प्रशासन अधिकारी यांनी शासन आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत

**(४३) ७०७४० (०१-०९-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी, मनपा प्रशासन अधिकारी यांनी शासन आदेशाचे उल्लंघन करून कारवाई न करता प्रकरण दडपल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३ ते २०२३ या १० वर्षांच्या कालावधीतील प्रलंबित असलेल्या माध्यमिक, प्राथमिक व शिक्षण मंडळ सोलापूर महापालिका शिक्षण मंडळ यांच्याकडे निर्णय घेण्याचे आदेश शिक्षण मंत्री यांनी शिक्षण आयुक्त यांना माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास पुणे येथे झालेल्या बैठकीत शिक्षण उपसंचालकांनी २२ मुद्यांचा आढावा घेत चौकशीचे आदेश प्राथमिक, माध्यमिक व महापालिका प्रशासन अधिकारी यांना देऊन केलेल्या कारवाईचा अहवाल मागितला होता, मात्र दोन महिने उलटून ही कार्यवाही झाली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कार्यवाहीचा अहवाल सादर न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (३१-१०-२०२३) :** (१) नाही.
(२) सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागांशी संबंधित तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी सुनावणीअंती संबंधित शिक्षणाधिकारी तसेच प्रशासन अधिकारी, मनपा यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी तक्रारीतील काही मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली असून उर्वरित मुद्यांच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयांकडून कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कातून सवलत देण्याबाबत

**(४४) ७०८३७ (२९-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कातून सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या एकूण १० टक्के विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या शुल्कामध्ये ५० टक्के सूट देण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती विद्यापीठांनी प्रवेशा प्रक्रियेबाबतचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे वा करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांना योग्य लाभ मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-१०-२०२३) :**(१) होय;

(२), (३), व (४) दिनांक २२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये समाविष्ट सर्व शुल्कातून सवलत देणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विना अनुदानित व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना वैद्यकीय सुविधांचा लाभ देण्याबाबत

**(४५) ७०९०१ (०१-०९-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विना अनुदानित व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना वैद्यकीय लाभ मिळत नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याने आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीमध्ये मोठ्या आर्थिक प्रश्नांच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत शासकीय तसेच १०० % अनुदानित खाजगी शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे विस्तारिकरण दि. २२ जुलै, २०२३ च्या सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णयान्वये करण्यात आले असून त्याअंतर्गत प्रती कुटुंब रु.५.०० लक्ष एवढे आरोग्य संरक्षण देण्यात येत आहे. सदर योजनेच्या लाभार्थी घटकांमध्ये शुभ्र शिधापत्रिका धारक कुटुंबे (शासकीय/निमशासकीय) यांचा समावेश होतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गरीब कुटूंबाला ‘आनंद शिधा’ योजनेच्या जाहिरांतीवर कोट्यवधींचा खर्च होत असल्याबाबत**

**(४६) ७१०५३ (३०-०८-२०२३). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब कुटूंबियांना ‘आनंद शिधा’ योजनेतंर्गत फक्त एक किला‍े धान्य दिले जाते मात्र या जाहिरांतीवर शासन कोटयवधी रुपये खर्च करीत असल्याची बाब माहे एप्रिल-2023 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गरीब कुटूंबियांना ‘आनंद शिधा’ योजनेतंर्गत देण्यात येणारे धान्य अत्यल्प असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरील योजनेबाबत आपली भुमिका स्पष्ट करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२७-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

दि.२२.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ योजनेच्या व १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील केशरी शेतकरी पात्र शिधापत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, इ. सणांनिमित्त ई-पॉस प्रणालीद्वारे प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेल्या शिधाजिन्नस संचांचे वितरण करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ सुनिश्चित करण्याकरीता, या योजनेबाबतची जनजागृती करण्यासाठी एकूण रू.४०,२५,९०६/- (अक्षरी रूपये चाळीस लाख पंचवीस हजार नऊशे सहा फक्त ) एवढा खर्च झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**बीड विधानसभा मतदार संघामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ येथील विभागीय लेखापाल यांनी केलेल्या अनियमिततेबाबत**

**(४७) ७१४०९ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड विधानसभा मतदार संघातील पुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ येथे कार्यरत व आता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ या ठिकाणी कार्यरत असणारे श्री.पिंटुकुमार गुप्ता, विभागीय लेखापाल यांच्या कार्यकाळात निशा एंटरप्रायजेस, छत्रपती संभाजीनगर, माही एंटरप्रायजेस, सॉफ्ट पॉवर, स्काय मल्टीसर्व्हिस, शालु एंटरप्रायजेस या व इतर एजन्सीमार्फत विविध लेखाशिर्षामधून अनियमितता करत कोट्यवधी रूपयांचे बोगस देयके काढलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ ते जुन, २०२३ या कालावधीमध्ये उक्त कामांसाठी एकूण किती खर्च करण्यात आला तसेच उक्त कामाची देयके काढण्यासाठी आर्थिक देवाण-घेवाण करीत असल्याच्या तक्रारी संबंधित विभाग व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त झाल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध लेखाशिर्षामधून अनियमितता करत असिस्टंट पासवर्डचा गैरवापर करून संबंधित एजन्सीच्या नावे झेरॉक्स, स्टेशनरी यांची बनावट व खोटी देयके तयार करणे, कोणत्याही स्वरूपाची निविदा न काढता, सदरील एजन्सीचा जीएसटी नंबर न तपासता तसेच आयकरची तपासणी न करता एजन्सीला निधी देवून मोठया प्रमाणावर आर्थिक अनियमितता केल्याची तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व प्रकारच्या आर्थिक अपहाराची त्रयस्त समितीमार्फत तात्काळ संचिका निहाय, स्तर निहाय चौकशी व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-११-२०२३) :**(१) नाही.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी व राजकीय पक्ष प्रतिनिधी यांनी महालेखापाल (ले.व को.), नागपूर यांच्याकडे तक्रारी केल्या असून, त्याच्या प्रती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयास अग्रेषित केल्या आहेत.
(५) विभागीय लेखाधिकारी ग्रेड-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद हे महालेखापाल (ले.व को.), नागपूर कार्यालयाच्या आस्थापनेवरील असून, त्यांनी सदर तक्रारींच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी करुन अहवाल सादर केला आहे. तसेच, क्षेत्रीय कार्यालयाने गठीत केलेल्या समितीने पण सदर तक्रारींची चौकशी करुन चौकशी अहवाल सादर केला आहे. या दोन्ही अहवालानुसार या प्रकरणी अनियमितता झालेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत विभागाच्या कामांची कामनिहाय चौकशी होणेबाबत

**(४८) ७१४१६ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जा.क्र.उविबीबी/ताशा/१३७/२२३ दि.३०.०४.२०२३ नुसार दिनांक ११ जानेवारी, २०१९ ते दिनांक २९ मार्च २०२३ पर्यंत विविध कंत्राटदाराने विविध लेखाशिर्षद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विद्युत विभागाशी निगडीत असलेली सुमारे ६०४ व इतर अनेक कामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व शासनाकडे तक्रारी प्राप्त असून या कामांमध्ये सुधारणा करण्याबाबत लेखी कळविले आहे, परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त कार्यालयाने व त्यातील तत्सम अधिकाऱ्याने या तक्रारींकडे दुर्लक्ष करुन वारंवार अनियमितता करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटदाराला कामे वाटप होत असतांना एकत्रित निविदा न काढता काही ठरावीक कंत्राटदारालाच SR, AMC (२०५९,२०१६), MOW, DPDC, Deposit work व इतर लेखाशिर्षातील कामे देण्यात आलेली असून CVC च्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने याची त्रयस्त समितीमार्फत दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२३) :** (१) होय
(२) नाही
(३) सर्व प्रकारची कामे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार करुन घेतली जातात.
(४) व (५) मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या दि. १८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता (विद्युत) दक्षता व

गुण नियंत्रण, मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे पथकाद्वारे सखोल चौकशी करण्याचे काम प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**बीड येथील उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागातील कामांमध्ये झालेली अनियमितता**

**(४९) ७१५३५ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागातील श्री.सिरसाळकर यांच्या अपरोक्ष कालावधीमध्ये संबंधित कार्यालयाकडून सर्व लेखाशिर्ष अंतर्गत कामे मंजुर झालेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १) मे.समर्थ इलेक्ट्रीकल्स वर्क्स व जनरल सप्लायर्स औद्योगिक सह.संस्था म.बीड २) मे.रिन्युऑरबीट एनर्जी, बीड व ३) मे.वैष्णवी इलेक्ट्रीकल्स सर्व्हिसेस, बीड/गेवराई यांच्या नावे सन २०१९ ते जुलै २०२३ या कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अनेक कामे करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील एजन्सीद्वारे पुर्ण केलेली कामे, अपुर्ण कामे व त्या कामांवर झालेला खर्च या बाबतच्या तपशीलवार माहितीची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त एजन्सीला वारंवार सर्व लेखाशिर्ष अंतर्गत कामे देण्यात आलेली असून सदर कामे नियमांचे उल्लंघन करुन निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२३) :** (१) श्री गजानन सिरसाळकर, हे बीड विद्युत उपविभाग,बीड येथे दि. ३१.१२.२०१८ पासून दि. ३०.०५.२०२३ पर्यंत उप अभियंता पदावर कार्यरत होते व सदर कालावधीत विविध लेखा शिर्षाखाली कामे मंजूर झालेली आहेत.
(२) होय,
(३) होय,
(४), (५) व (६)
मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या दि. १८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता (विद्युत) दक्षता व गुण नियंत्रण, मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे पथकाद्वारे सखोल चौकशी करण्याचे काम प्रगतीत आहे.

---

**बीड येथील तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या अनियमिततेबाबत**

**(५०) ७१५७० (११-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी श्री.जाधव यांच्या सन २०१९-२०२० या कालावधीत वरिष्ठ कार्यालयाकडून शालेय पोषण आहाराअंतर्गत अंदाजे ५१ लाख रूपये अनुदान प्राप्त झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी संस्थेच्या अनुदानित/विना अनुदानित एकूण ६०१ शाळा असून गट शिक्षण अधिकारी, बीड आणि संबंधित कर्मचारी यांनी माहे ऑक्टोबर, २०१९ पर्यंत एकूण १३४ शाळांना

अनुदान देण्यात आले असून सदर शाळांना कोणत्या निकषाद्वारे अनुदान देण्यात आले तसेच या अनुदानाचा विनीयोग कशा प्रकारे केला याचा बोध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच समग्र शिक्षा अभियान अंतर्गत देखिल त्यांनी बहुतांश निधी हा खर्च केला नसल्याचे निदर्शनास आल्याने वरिष्ठ कार्यालयाकडे शिक्षण समितीचे सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

दुष्काळग्रस्त / टंचाईसदृश भागात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आठवड्यातून तीन दिवस दूध/अंडी/फळे/पौष्टिक आहार देण्यासाठी प्रति विद्यार्थी प्रति दिन रु.५/- याप्रमाणे प्रति विद्यार्थी प्रति आठवडा रु.१५/- इतका निधी खर्च करण्यास दि.२९ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने गट शिक्षणाधिकारी कार्यालय, बीड यांना विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार वितरणासाठी रु.५०,६४,४८५/- इतका निधी वितरीत करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि.२९ मे, २०१७ अन्वये महसूल विभागाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त / टंचाईसदृश गावामध्ये विद्यार्थ्यांना आठवड्यातून तीन दिवस दूध / अंडी / फळे / पौष्टिक आहार देणे आवश्यक होते त्यानुसार बीड तालुक्यातील पात्र १५४ गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. प्रस्तुत शाळांना गट शिक्षणाधिकारी, बीड यांच्या कार्यालयामार्फत दि.२४ फेब्रुवारी, २०२० रोजी RTGS/NEFT व्दारे निधी वितरीत केला आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत अखर्चित निधीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. तसेच, सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या समक्ष सुनावणी देखील घेण्यात आलेली आहे. चौकशी समितीच्या निष्कर्षावरुन सदर योजनेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.